# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.४१६ ००४


**परीक्षा प्राधान्य / महत्वाचे**

क्रमांक कोविमं/१२ वी प्रात्यक्षिक/ 1089
कोल्हापूर - ४१६००४
दिनांक -०९/०९/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय :- उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र परीक्षा सप्टें/ऑक्टो २०२१ शास्त्र प्रात्यक्षिक /तोंडी /श्रेणी परीक्षेचे साहित्य वितरणाबाबत.**

संदर्भ :- क्र. कोविमं/उच्च माध्यमिक / प्रात्यक्षिक / 1037/ दिंनाक ०८/०९/२०२१ चे परिपत्रक.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय परिपत्रक मंडळाच्या संकेत स्थळावर टाकले असून कृपया सदर परिपत्रकाचे अवलोकन व्हावे.

प्रात्यक्षिक तोंडी अंतर्गत मुल्यमापन परिक्षेचे गुण **O.M.R** गुणतक्त्यामध्ये नोंदवण्यासाठी सदरची **O.M.R** पद्धतीचे गुणतक्ते, श्रेणीतक्ते (ग्रेडलिस्ट) व प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेच्या उत्तरपत्रिका व अनुषंगिक साहित्य १४/०९/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० या वेळेत आपल्या वितरण केंद्रावर वाटप करण्यात येणार आहे.

उपरोक्त साहित्य स्विकारण्यासाठी आपला प्रतिनिधी आपल्या सही शिक्यानिशी आधिकार पत्र घेवून संबंधित वितरण केंद्रावर वेळेत पाठवण्यात यावा . साहित्य स्विकारण्यास येणाऱ्या प्रतिनिधींनी साहित्य आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयाचे असल्याचे खात्री करुन स्विकारावे. इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षा पुर्ण झाल्यानंतर परीक्षोत्तर साहित्य **O.M.R** पद्धतीचे गुणतक्ते, श्रेणीतक्ते यापूर्वीच कळविलेल्या तारखेस म्हणजे ०५/१०/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० या वेळेत आपल्या वितरण केंद्रावर जमा करण्यात यावीत.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रति,

**सर्व वितरण केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रात्यक्षिक परीक्षा पूर्व साहित्य दिनांक १५/०९/२०२१ रोजी कनिष्ठ महाविद्यालयांना वितरित करावे व प्रात्यक्षिक परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य दि.०५/१०/२०२१ रोजी स्विकारुन सदरचे साहित्य (उत्तरपत्रिका, देयक, O.M.R गुणतक्ते, श्रेणीतक्ते, गैरहजर पाकिटे इत्यादी याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय) वर्गीकरण करून ०६/१०/२०२१ रोजी मंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे सकाळी १०.०० ते २.०० या वेळेत पोहोच करावे.**